**ठळक बातम्या**

- भारताला जगातल्या तीन प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक बनवण्यासाठी प्रथम श्रेणी आणि द्वितीय श्रेणीतल्या शहरांचा आर्थिक विकास अत्यंत महत्त्वाचा असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- मध्यम आकाराच्या लढाऊ विमान निर्मिती प्रकल्पाच्या अंमलबजावणीला संरक्षण मंत्र्यांची मान्यता

- राष्ट्रपतींच्या हस्ते आज पद्म पुरस्कारांचं वितरण

- छत्तीसगडमधे सुकमा इथं १८ नक्षलींचं आत्मसमर्पण

**आणि**

- राज्यात पावसाचा जोर कायम / अनेक ठिकाणी पूरसदृश स्थिती

**<><><><><><>**

भारताला जगातल्या तीन प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक बनवण्यासाठी प्रथम श्रेणी आणि द्वितीय श्रेणीतल्या शहरांचा आर्थिक विकास अत्यंत महत्त्वाचा असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज गुजरातमधे गांधीनगर इथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. जगातल्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेच्या क्रमवारीत आपण ११व्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर झेप घेतली आहे, असंही मोदी यावेळी म्हणाले.

**होल्ड बाईट - नरेंद्र मोदी**

प्रधानमंत्री गुजरातच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी आज गांधीनगरमध्ये 'ऑपरेशन सिंदूर सन्मान यात्रेला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी

त्यांच्यासोबत गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिकांनी ऑपरेशन सिंदूरसाठीचे फलक आणि तिरंगा हातात घेऊन घोषणा दिल्या.

**<><><><><>**

मध्यम आकाराच्या लढाऊ विमान निर्मिती प्रकल्पाच्या अंमलबजावणीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मान्यता दिली आहे. नव्या स्वरूपात हा कार्यक्रम राबवताना सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रांना समान संधी मिळेल, असं संरक्षण मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. या लढाऊ विमानांचं उत्पादन देशात अधिक क्षमतेनं होऊ लागलं की, संरक्षण क्षेत्रातल्या आत्मनिर्भरतेच्या वाटेवर महत्त्वाचा टप्पा पार होईल.

**<><><><><>**

दहशतवादाविरोधात भारताच्या शून्य सहिष्णूतेच्या धोरणाचा संदेश जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी भाजप खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळानं काल फ्रान्समध्ये भारतीय समुदायाशी संवाद साधला. भारताला शेजारी देशाबरोबर शांतता हवी असली तरीही हल्ला झाल्यास भारत शांत राहाणार नाही, राज्यसभेतले खासदार गुलाम नबी आझाद यांनी स्पष्ट केलं. हे शिष्टमंडळ पुढे इटली, युके, जर्मनी, डेन्मार्क आणि युरोपियन युनियनला भेट देणार आहे.

खासदार श्रीकांत शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळांनीही काल दक्षिण कोरिया, कुवेत, कतार, काँगो आणि स्लोव्हेनिया आदी विविध देशांच्या भेटी घेऊन दहशतवादाविरोधातली भारताची भूमिका स्पष्ट केली.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज संध्याकाळी नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं विविध मान्यवरांना पद्म सन्मान प्रदान करणार आहेत. या वर्षी सरकारनं १३९ पद्म पुरस्कारांची घोषणा केली असून त्यामध्ये ७ पद्म विभूषण, १९ पद्म भूषण आणि ११३ पद्मश्रीं चा समावेश आहे. पहिल्या समारंभात राष्ट्रपतींनी ७१ पद्म सन्मान प्रदान केले. आजच्या कार्यक्रमात ६८ मान्यवरांना पद्म सन्मान प्रदान करण्यात येतील.

<><><><><>

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधे पारंपरिक तत्त्वांचं जतन करुन भविष्याचा वेध घेणारं शिक्षण देण्यात येत असल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत मिडीया नेटवर्क शैक्षणिक परिषदेत बोलत होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण भविष्यातल्या शिक्षणासाठी दूरदृष्टीने तयार केलं असून देशातल्या शिक्षण क्षेत्रानं मोठी प्रगती केल्याचही त्यांनी म्हटलं आहे. यामध्ये पायाभूत सुविधा, सर्वसमावेशकता आणि आधुनिकतेला प्राधान्य देण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

निर्यात केंद्रित उद्योग आणि विशेष आर्थिक क्षेत्रांमधल्या उद्योगांमधून झालेल्या निर्यातीवर शुल्क माफी आणि कर योजने अंतर्गत दिले जाणारे लाभ पुन्हा सुरू करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. १ जूनपासून याची अंमलबजावणी केली जाईल. याआधी हे लाभ ५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत दिले जात होते. जागतिक बाजारात भारताची निर्यात क्षमता वाढावी, हा या योजनेचा हेतू आहे.

<><><><><>

देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज एक्स समाजमाध्यमावर पंडित नेहरु याचं स्मरण केलं आहे. काँग्रेस अध्यक्ष

मल्लिकार्जुन खरगे, तसंच काँग्रेस नेते सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतर मान्यवरांनी दिल्लीत शांतिवन या पंडित नेहरूंच्या स्मृतिस्थळी जाऊन आदरांजली वाहिली.

<><><><><>

केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रताप जाधव यांच्या उपस्थितीत पुदुच्चेरी इथं आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या उलटगणतीच्या २५ दिवसीय कार्यक्रमाचं आज उद्घाटन झालं. २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या मुख्य सोहळ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी विशाखापट्टणम इथल्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. तत्पूर्वी देशभरात विविध ठिकाणी योग दिनाच्या काउंटडाऊन कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे.

<><><><><>

छत्तीसगडमधल्या सुकमा इथं १८ नक्षलींनी आज आत्मसमर्पण केलं. दक्षिण बस्तरमधे कार्यरत असणाऱ्या बटालियन एक मधल्या चार नक्षलींचा यात समावेश आहे. नियाद नेल्लनार योजने अंतर्गत नक्षलींनी हे आत्मसमर्पण केलं. या योजनेचा लाभ त्यांना दिला जाईल, असं सुकमाचे पोलीस निरीक्षक किरण चव्हाण यांनी सांगितलं. सर्व नक्षलींनी आत्मसमर्पण करावं, असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज मुंबईत माधवबाग मंदिराच्या दीडशेव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भाग घेतला. या संस्थेत वेद, उपनिषद आणि गीतेचा अभ्यास करण्याचे कार्य करण्याबरोबरच आरोग्य सेवा पुरवण्याचे कार्य व्हावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

<><><><><>

राज्याच्या बहुतांश भागांत पावसाचा जोर कायम असून बऱ्याच ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं आहे. राजधानी मुंबईत आज सकाळपासून ढगाळ वातावरण असून अधूनमधून पावसाच्या हलक्या सरी येत आहेत. मुंबई शहर आणि उपनगरात आज मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. विक्रोळी भागात काल संध्याकाळी झाड कोसळून एका युवकाचा मृत्यू झाला, तर दोघे जखमी झाले. लातूरमध्ये काल संध्याकाळी झाडावर वीज कोसळून दोघे मृत्युमुखी पडले, तर सहा जण गंभीर जखमी झाले.

**रत्नागिरी** जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून जोरदार पाऊस आहे आणि मे महिन्यात पावसामुळे एकंदर ३२ लाख रुपयांचं नुकसान झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली आहे. दरम्यान, लांज्यात भिंत कोसळून एक जण ठार झाला, इतर तिघे जखमी झाले, तर गुहागरमध्ये झाड कोसळून तीन जण जखमी झाले.

**नाशिक** जिल्ह्यामध्ये  पाऊस सुरू असून कसारा घाटामध्ये  काल दरड कोसळली होती.त्यामुळे वाहतुकी वरती परिणाम झाला होता. तातडीने ही दरड हलवून वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे. जिल्ह्यातील चार तालुक्यांनी पावसाची शंभरी पार केली आहे. इगतपुरी पेठ सुरगाणा दिंडोरी  या परिसरात पावसाचा जोर कायम आहे. काल रात्री सुरगाणा तालुक्यात सादूडने इथं वीज कोसळून एकाचा मृत्यू झाला.

**अहिल्यानगर** जिल्ह्यात काल तीस मिलिमीटर पावसाची नोंद झाली यामध्ये सर्वाधिक पावसाची नोंद कर्जत तालुक्यातील वालवड मंडळात आणि कर्जत मंडळात झाली.

**धाराशीव** जिल्ह्यालाही काल पावसाने झोडपून काढलं. अहिल्यानगरमध्येही काल रात्री मुसळधार पाऊस झाला. पावसामुळे भिंत कोसळून एक महिला ठार झाली. **परभणी** जिल्ह्यात पावसामुळे पपई आणि आंब्याच्या बागांचं मोठं नुकसान झालं. अनेक ठिकाणी झाडं पडल्यामुळे वीज पुरवठाही खंडित झाला होता.

हवामान विभागानं आज **कोकण** आणि **मध्य महाराष्ट्राला** रेड अलर्ट दिला आहे. इथं वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा अंदाज आहे. उद्या या भागांसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

**<><><><><>**

**पुणे** जिल्ह्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस सुरू आहे. बारामती येथे विक्रमी पाऊस पडल्याची नोंद झाली. बारामती आणि इंदापूर तालुक्यातील १४३ घरांमध्ये पाणी शिरलं. तर, दौंड आणि खेड तालुक्यात प्रत्येकी एक अशा दोघांचा मृत्यू झाला. **बारामती आणि इंदापूर** तालुक्यांना या पावसाचा सर्वाधिक फटका बसला आहे.  **भीमा आणि नीरा** खोऱ्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे पंढरपुरात चंद्रभागा नदी दुथडी भरून वाहू लागली आहे. सकाळी चंद्रभागा नदीवरील जुना दगडी पूल पाण्याखाली गेला. तर, नदीपात्रातल्या  मंदिरांना पाण्याने वेढा दिला आहे. भीमा आणि नीरा या दोन नद्यांवरचे  २१ बंधारे पाण्याखाली गेले आहेत.

**<><><><><>**

महाबळेश्वरमध्ये तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय मान्सूनपूर्व आढावा बैठक घेण्यात आली.  नैसर्गिक आपत्ती संबंधित कार्यालयातल्या  सर्व यंत्रणा सुरु  ठेवाव्यात,  तसेच अधिकाऱ्यांनी कार्यालयातील दुरध्वनी आणि वैयक्तीक मोबाईल २४ तास सुरु  ठेवण्याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या. अवकाळी पाऊस, अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसानीचे ,  मनुष्य हानी, पशुधन हानी, घरांच्या पडझड या सगळ्यांचे तात्काळ पंचनामे करुन अहवाल सादर करण्याचे निर्देशही  यावेळी देण्यात आले.

**//<><><><><>//**